गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती जामखेड पदाचे कर्तव्य
व जबाबदारी इतर अधिकारी यांचेकडे सोपविणेबाबत

अहमदनगर जिल्हा परिषद
शिक्षण विभाग (प्राथ)
आदेश .क्र.कार्या.2/आस्था-3/ 646 /2024
अहमदनगर दि. 21 /06/2024

वाचा: -1.शासन आदेश क्र.बदली 3123/प्र.क्र.27/प्रशा-2 दि.21/3/ 2023
2.शासन पत्र क्र.न्यायप्र-2923/प्र.क्र.81/प्रशा-2/दि 24 मे 2024
3. मा.शिक्षण उपसंचालक,(प्रशासन)शिक्षण आयुक्तालय पुणे यांचेकडील आदेश क्र.आशिका/आस्था-अ/2024/102/03723 दि.12/6/2024
4. म.जि.प.प.स.अधिनियम 1961 मधील नियम 95 (2)(क)(तीन)

उपरोक्त संदर्भ क्र. 1 चे आदेशान्वये श्री.बाळासाहेब यमाजी धनवे,उपशिक्षणाधिकारी जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षण विभागअहमदनगर यांना गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती जामखेड या पदावर प्रशासकीय कारणास्तव बदलीने पदस्थापना देण्यात आलेली आहे.

तथापी शिक्षण उपसंचालक प्रशासन आयुक्त शिक्षण कार्यालय पुणे यांचेकडील दि.12/06/2024 चे आदेशान्वये मा.प्रशासकीय न्यायाधिकरण औरंगाबाद यांनी दिनांक 15/04/2024 चे निकालानुसार श्री.बाळासाहेब यमाजी धनवे यांची प्रशासकीय बदलीचे आदेश रदद केलेले असल्याने त्यांची मुळ पदावर उपशिक्षणाधिकारी माध्यमिक जिल्हा परिषद अहमदनगर येथे रिक्त पदावर पदस्थापना करण्यात आलेने त्यांना कार्यमुक्त करण्यात येत असलेबाबत कळविलेले आहे.

सबब श्री.बाळासाहेब यमाजी धनवे,गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती जामखेड,जि.अहमदनगर यांना शिक्षण उपसंचालक प्रशासन आयुक्त शिक्षण कार्यालय पुणे यांचेकडील दि.12/06/2024 चे आदेशान्वये उपशिक्षणाधिकारी माध्यमिक जिल्हा परिषद अहमदनगर या पदावर पदस्थापना करण्यात आलेने त्यांना कार्यमुक्त करण्यात आलेने त्यांचेकडील गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती जामखेड पदाचा कार्यभार नियमित गटशिक्षणाधिकारी हजर होईपर्यत अथवा पुढील आदेश होईपर्यंत श्री.---खैरे(विस्तार अधिकारी सा) -पंचायत समिती जामखेड..-- यांचेकडे तात्पुरत्या स्वरुपात सोपविण्यात येत आहे.

तरी आपण मुळ पदाचे कर्तव्य व जबाबदा-या सांभाळुन गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती पदाचे कर्तव्य व जबाबदा-या पार पाडाव्यात. तसेच सदर आदेशाची त्वरीत अंमलबजावणी करण्यात येऊन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तात्काळ या कार्यालयास विनाविलंब सादर करावा.

सदरचा आदेश अहमदनगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक 202406211600094 असा आहे.

Signed by Ashish
Mukundrao Yerekar
Date: 20-06-2024 13:42:47

(आशिष येरेकर भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहमदनगर

प्रति-

Scanned with OKEN Scanner

1. श्री.बाळासाहेब यमाजी धनवे,गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती जामखेड, जि.अहमदनगर

2/-शिक्षण उपसंचालक प्रशासन आयुक्त शिक्षण कार्यालय पुणे यांचेकडील दि.12/06/2024 चे आदेशान्वये आपली उपशिक्षणाधिकारी माध्यमिक जिल्हा परिषद अहमदनगर या पदावर पदस्थापना करण्यात आलेने आपणास सदरचे पदावर हजर होणेसाठी कार्यमुक्त करण्यात आलेले आहे करिता सदरचे आदेशाची तात्काळ अमलबजावणी करावी. तसेच आपलेकडील गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती जामखेड पदाचा कार्यभार उक्त आदेशाप्रमाणे तात्काळ हस्तातंरीत करण्यात यावा.

2. श्री. कैलास भास्करराव खैरे, विस्तार अधिकारी सांख्यिकी पंचायत समिती जामखेड,

2/- गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती जामखेड या पदाचा कार्यभार हस्तांतरीत करुन घेऊ आपले मुळ कार्यभारासह गटशिक्षणाधिकारी पदाचे कर्तव्य सांभाळावे.प्रकरणी तक्रार उद्भवणार नाही याची गांभिर्याने दक्षता घ्यावी.

प्रत- माहितीस्तव सविनय सादर

1 .मा.आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य पुणे

2. मा.शिक्षण उपसंचालक,पुणे विभाग पुणे

3. मा.जिल्हा कोषागार अधिकारी, अहमदनगर

स्वाक्षरीत -

(आशिष येरेकर भाप्रसे)

मुख्य कार्यकारी अधिकारी

जिल्हा परिषद अहमदनगर

Scanned with OKEN Scanner